# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ३७-२२ | दिनांक ०४/०२/२०२२

## घरफोडी करणा-या दोन सराईत गुन्हेगारांना अटक करुन ६,३६,०००/- रु. किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक २४/०१/२०२२ रोजी ओमनगर परीसरामध्ये घरफोडी झाल्याने माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५/२०२२ कलम ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने मध्यवर्ती गुन्हे शाखा, मि.भा.व.वि. यांच्या मदतीने सि.सि.टि.व्ही. कॅमेरे व तांत्रिक मदतीच्या आधारे सलग ४ दिवस आरोपींचा शोध घेवुन नालासोपारा व माहुलगाव म्हाडा, मुंबई येथुन सापळा रचुन एकुण दोन आरोपी १) आरीफ याकुब शेख, वय २५ वर्षे, रा. द डन टर्फ ग्राऊंड, अग्रवाल फायर ब्रिगेडजवळ, सेंठ विदयामंदिर हायस्कुलच्या मागे, नालासोपारा पुर्व, जि. पालघर व २) साहिल ऊर्फ शाहबाज इसाक शेख, वय ३६ वर्षे, रा. आझादनगर, गावदेवी मंदिराजवळ, एस. डी. एम. कंम्पाऊंडसमोर, कृष्णाचाळ, धानिवबाग, नालासोपारा पुर्व, जि. पालघर यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन घरफोडी चोरीतील एकुण ६,३६,०००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करण्यात माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले आहे.

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. भाऊसाहेब आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.ह.क्र. ०२०१२/शैलेश पाटिल, पो.ना.क्र. ०७०२८/धनंजय चौधरी, पो.ना.क्र. ०७०४१/शामेश चंदनशिवे, पो.शि.क्र. १४१३९/गोपाळ कोळेकर व पो.शि.क्र. १७०२६/प्रविण कांदे यांनी केलेली आहे.